॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com


मनुष्य बोलण्याने जेवढा घोटाळा करतो, तेवढा गुपचूप राहिल्याने करीत नाही.

– महात्मा गांधी







■ अहिल्यानगर ■ गुरुवार, दि. १४ नोव्हेंबर २०२४ ■ वर्ष ५ वे ■ अंक २३२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145




देशातील सहकार चळवळीने समताचा आदर्श घ्यावा

पान क्र. २ वर



प्रताप ढाकणे यांच्या संघर्षाला व खंबीर नेतृत्वाला न्याय द्या

पान क्र. ३ वर



घोटण, खानापूर मध्ये शेकडो युवकांचा भाजपत प्रवेश

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### राज्यात १०० टक्के अपक्षांचे सरकार : बच्चू कडू

● **मुंबई** – राज्यात महाविकास आघाडी अथवा महायुतीचे नाही तर अपक्षांचे सरकार येईल असे बच्चू कडू यांना वाटत आहे. राज्यात १०० टक्के अपक्षांचे सरकार येईल असा दावा त्यांनी केला. अपक्ष आणि छोट्या पक्षांचे सरकार येईल, शंभर टक्के येईल. एक तर मोठ्या पक्षांना अपक्ष बाहेरून पाठिंबा देतील अथवा अपक्षांच्या सरकारमध्ये आताचे बडे पक्ष सामील होतील असा दावा त्यांनी केला. यंदा राज्यात खिचडी सरकारचा प्रयोग होण्याचे मोठे संकेत बच्चू कडू यांनी दिले. राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडीत महा–मुकाबला होत आहे. दोन्हीकडील तीन पक्ष आणि घटक पक्षांना घेऊन सर्वच जण मैदानात उतरले आहेत.

### मोदींची आज मुंबईत शिवाजी पार्कवर सभा

● **मुंबई** – विधानसभा निवडणुकीतील महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, गुरूवारी राज्याच्या दौऱ्यावर येत असून ते दिवसभरात ३ सभा घेणार आहेत. मोदींची आजच्या दौऱ्यातील शेवटची शिवाजी पार्कच्या मैदानावर होत आहे. या वेळी महायुतीचे नेते आणि उमेदवार उपस्थित राहणार आहेत. मोदींच्या सभेच्या निमित्ताने भाजपने जोरदार शक्तिप्रदर्शनची तयारी केली आहे. मोदींच्या सभेच्या माध्यमातून मुंबईत वातावरण निर्मिती करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबरला मतदान आहे. भाजपने आपल्या शिर्षस्थ नेत्यांच्या निवडणूक सभांचा सपाटा लावला आहे. त्यानुसार पंतप्रधान मोदी गुरूवारी दिवसभरत ३ सभा घेणार आहेत. पंतप्रधान मोदी यांची पहिली सभा दुपारी १ वाजता छत्रपती संभाजीनगर येथे होईल. त्यानंतर नवी मुंबईतील सेंट्रल पार्क खारघर येथे दुपारी ४ वाजता मोदींची दुसरी सभा पार पडेल. नवी मुंबईची सभा आटोपून मोदी संध्याकाळी ६ वाजता दादर, शिवाजी पार्क येथे आयोजित सभेला संबोधित करतील. तत्पूर्वी मोदी शिवसेनाप्रमुखांच्या स्मारकाला अभिवादन करतील.

# आता सत्ताधारी नेत्यांची बॅग तपासणी

## विरोधकांच्या टीकेनंतर निवडणूक अधिकारी सक्रिय । अजित पवार, एकनाथ शिंदेंच्या बॅगांची तपासणी

● **मुंबई । वीरभूमी** – शिवसेना ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्या बॅगा निवडणूक अधिकाऱ्यांकडून लागोपाठ दोन दिवस तपासण्यात आल्यानंतर सत्ताधाऱ्यांना आयोगाकडून झुकते माप देण्यात येत असल्याची टीका होऊ लागल्याने बुधवारी निवडणूक आयोगाचे कर्मचारी चांगलेच सक्रिय झाले व त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्याही बॅगा तपासून आम्ही नि:ष्पक्ष असल्याचे दाखवून दिले.





उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हेलिकॉप्टरची व बॅगांची बारामती येथे निवडणूक अधिकाऱ्यांनी तपासणी केली. यावेळी अजितदादांच्या बॅगांमध्ये चकल्या सापडल्या. दरम्यान, अजित पवार त्यांच्याकडील दुसरा डबाही तपासण्यासाठी देत असल्याचे व्हिडीओत दिसून आले. निवडणुका मुक्त आणि मोकळ्या वातावरणामध्ये पार पडाव्या यासाठी अशा प्रकारच्या उपाययोजना गरजेच्या आहेत, असे अजित पवार यांनी यावेळी सांगितले. बारामती मतदारसंघात त्यांची बॅग तपासण्यात येत असतानाचा व्हिडीओ 'एक्स'वर पोस्ट करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बुधवारी पालघर दौऱ्यावर होते. पालघर दौऱ्यावर असताना त्यांच्या बॅगांची तपासणी करण्यात आली. यावेळी त्यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. 'माझ्या बॅगेत फक्त कपडे आहेत, युरिन पॉट नाही', असे शिंदे म्हणाले.

त्यापूर्वी कोल्हापूर विमानतळावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या बॅगेची तपासणी करण्यात येत असल्याचा व्हिडीओ भाजपने 'एक्स'वर पोस्ट केला. काही जणांना नाटक करण्याची सवयच असते, केवळ घटना हातात धरणे पुरेसे नाही, घटनेचे पालन करणेही महत्त्वाचे आहे, अशी या व्हिडीओच्या बाजूला पोस्ट करण्यात आली आहे.

### लोकांच्या दबावामुळे सत्ताधाऱ्यांच्या बॅगांची तपासणी

■ माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या बॅगा सुरक्षा यंत्रणानी दोनदा तपासली. त्याच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांच्या बॅगाही तपासा, अशी मागणी सर्व स्तरातून होऊ लागल्यामुळेच सत्ताधारी पक्षातील नेत्यांच्या बॅगांची तपासणी व्हायला लागली आहे, असा आरोप आ. रोहित पवार यांनी केला.

## रुपयाचे अवमूल्यन, सार्वकालिक नीचांकी पातळी गाठली

● **मुंबई । वीरभूमी**– स्थानिकभांडवलीबाजारातसमभाग विकून परकीय गुंतवणूकदारांच्या सतत सुरू असलेल्या गमनामुळे रुपयाची सार्वकालिक नीचांकी पातळीवर घसरणीची मालिकाही कायम आहे. सलग चौथ्या सत्रात रुपयाचे प्रतिडॉलर मूल्य आणखी दोन पैशांनी घसरून ८४.३९ वर स्थिरावले. दरम्यान अमेरिकेत ट्रम्प राजवटीत रुपयाचे ८ ते १० टक्क्यांनी अवमूल्यन होण्याचा कयास व्यक्त करणारा अहवाल स्टेट बँकेने प्रसिद्ध केला. सातत्याने रुपयाचे अवमूल्यन होत असल्याने भारत सरकारला याचा निष्कारण भुर्दंड सहन करण्याची वेळ आलेली आहे. कारण आयात मालासाठी भारताला मोठी किंमत मोजावी लागते.

सलग चौथ्या सत्रातील घसरण ही दौन पैशांवर सीमित राहिली. मध्यवर्ती बँकेच्या हस्तक्षेपामुळे चलनाला मोठे नुकसान टाळता आले आणि अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाचे विनिमय मूल्य ८४.३९ वर स्थिरावले. या अगोदर सरलेल्या सप्ताहाअखेर शुक्रवारी रुपयाने ८४.३७ या ऐतिहासिक नीचांकी पातळीवर विश्राम घेतला होता. या आठवड्यात त्यात पुन्हा घसरण झाली.

आंतरबँक चलन व्यापारात, तेल कंपन्या आणि परदेशी बँकांकडून डॉलरच्या मागणीमुळे रुपया दबावाखाली राहिला. तथापि, रिझर्व्ह बँकेने डॉलरचा पुरवठा खुला करून रुपयावरील ताण हलका केल्याचे विश्लेषकांचे म्हणणे आहे.

## घड्याळ चिन्ह गोठविण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

● **नवी दिल्ली । वीरभूमी**– राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ चिन्हाबाबत अजित पवार गटाला मोठा दिलासा दिला. शरद पवार गटाने अजितदादा गटाचे घड्याळ चिन्ह गोठवण्यात यावे, अशी मागणी केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने त्याला नकार दिला. त्याऐवजी तुम्ही एक इलेक्ट्रॉनिक परिपत्रक काढा आणि त्यात तुमचे उमेदवार, कार्यकर्त्यांना शरद पवारांचे फोटो आणि व्हिडीओ वापरु नका, अशा सूचना द्या, असे न्यायालयाने सुनावले. तसेच तुमचे वैचारिक मतभेद आहेत तर तुम्ही तुमच्या पायावर उभे राहा, असेही न्यायमूर्ती म्हणाले.

दोघांनी आपापल्या युद्धभूमीवर लक्ष केंद्रित करावे. व्हिडीओ वगैरेचा कधी कधी प्रभाव पडतो. दरवेळी मतदारांना प्रभावित करेल, असे नाही. आपल्या देशातील जनता खूप हुशार आहे, त्यांना कोणी फसवू शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले. अजित पवारांना घड्याळाऐवजी दुसरे चिन्ह देण्यात यावे, अशी मागणी शरद पवार गटाने केली होती. गेल्या सुनावणीत घड्याळ चिन्ह न्यायप्रविष्ट असल्याची जाहिरात अजित पवारांनी वर्तमानपत्रात द्यावी, असे निर्देश दिले होते.

आजच्या सुनावणीवेळी अजित पवार गटाने सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश पाळले असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले. आम्ही बारामतीत फिरवत असलेल्या गाड्यांवर न्यायप्रविष्ठ असल्याविषयीची जाहिरात दिली आहे, असेही अजित पवार गटाच्या वकिलांकडून सांगण्यात आले.

यावेळी अजित पवार आणि शरद पवार गटाच्या वकिलांमध्ये खडाजंगी झाल्याचे पाहायला मिळाले. घड्याळ चिन्ह गोठवण्याच्या मागणीवर अजित पवार गटाचे वकील म्हणाले की, कोणताही संभ्रम उरलेला नाही. हे कशाच्या आधारावर इथे अर्ज घेऊन आले, आम्ही न्यायप्रविष्ठ प्रकरण असल्याचा मजकूर सर्वत्र प्रसिद्ध केला, आज आम्ही पुरावे सादर केले, असे अजित पवारांच्या वकिलांनी सांगितले.

यावर शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी जोरदार हल्ला चढवला. हे स्वत: विरोधाभासी भूमिका मांडत आहेत. यांना शरद पवारांचे गुडविल वापरायचे आहे. अमोल मिटकरी यांनी काल ट्विट केले. त्यात शरद पवारांचा उल्लेख आहे. ग्रामीण भागातील मतदार ट्विटर वगैरे खरेच पाहतात का? ग्रामीण भागात दिल्लीतील घडामोडींचाही परिणाम होतो, असे अभिषेक मनु सिंघवी यांनी म्हटले.

# तुमच्या मनातील उत्सव, आनंद हा मोनिका राजळे यांच्या विजयाची नांदी ठरेल

## समन्वयक प्रितमताई मुंडे । पाथर्डी येथे मतदारसंघाचा घेतला आढावा

● **पाथर्डी । वीरभूमी**– कोण काय म्हणतं, कोण काय करतं, यासह इतर गोष्टींचा विचार करु नका, आपल्यासाठी काम करणारे कोण, आपल्या पाठीशी राहणारे कोण, याचा विचार करा, पाच वर्षात आपल्यासाठी कोणी काय केले याचा विचार करा. ही निवडणूक सोशल मीडियावर नाही, तर सामान्य जनतेपर्यंत जाऊन प्रत्यक्ष मैदानात उतरुन लढायची आहे. आपण केलेली विकास कामे, राबवलेल्या योजनांची माहिती जनतेला सांगायची आहेत. पक्षाने मला समन्वयक म्हणून केज व शेवगाव मतदार संघाची जबाबदारी दिली, याचा मला प्रचंड आनंद झाला. दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडायची, हा माझा स्वभाव आहे. तुमचा सर्वांच्या मनातील उत्सव, आनंद हा मोनिका राजळे यांच्या विजयाची नांदी ठरेल असे प्रतिपादन डॉ. प्रितम मुंडे यांनी केले आहे.

मंगळवारी सायंकाळी पाथर्डी येथे आमदार मोनिका राजळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत त्या बोलत होत्या. यावेळी अभय आव्हाड, मृत्युंजय गर्जे, भगवानराव बांगर, दिनेश लाव्हाट, अमोल गर्जे, अशोक चोरमले, धनंजय बडे, नंदकुमार शेळके, बाबा राजगुरू, मुकुंद गर्जे, प्रतीक खेडकर, सुभाष बर्डे, यांच्यासह महायुती घटक पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ प्रितम मुंडे या पाथर्डीत दाखल होताच त्यांचे जोरदार असे स्वागत करण्यात आले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पासून रॅली काढण्यात आली.

आमदार मोनिका राजळे ह्या माझ्या बहिणी सारख्या आहेत, असे भाषणाच्या सुरवातीला सांगत, प्रितम मुंडे पुढे म्हणाल्या, प्रत्येक निवडणुकीत कोणीतरी सोशल मीडियावर पिल्लू सोडते, मग त्या भोवती निवडणूक फिरते. सोशल मीडियाचा वापर चांगल्या कामासाठी व्हावा. कोण काय बोलते, काय करते यापेक्षा सरकारच्या योजना नागरिकांना सांगा. माझी संघर्षाची वेळ आहे, पण माझी तक्रार नाही. कोणत्याही संविधानिक पदापेक्षा गोपीनाथ मुंडेंची लेक हे पद माझ्यासाठी मोठे आहे. पंकजा मुंडे यांनी ग्रामविकास मंत्रालय काय असते हे २५१५ सारख्या विविध योजनांमधून दाखवून दिले. लोकसभेला झालेली चूक दुरुस्त करतांना पुढच्या आठ दिवसात विकासाचा मुद्दा घेऊन जनतेसमोर जाणार असल्याचे मुंडे म्हणाल्या.




> पंकजा ताईंनी परळी पेक्षा जास्त लक्ष आपल्या मतदार संघावर दिले. पक्षाचा कार्यकर्ता जरी त्यांच्याकडे काम घेऊन गेला तरी त्याला त्यांनी भरभरुन दिले. लोकसभेत जी चूक झाली ती विधानसभेत दुरुस्त करायची आहे. गावागावात लोक गुण्यागोविंदाने राहतात, मात्र विरोधक जातीपातीचे राजकारण आणतात. त्यामुळे विकासाचा मुद्दा मागे पडतो. लोकसभेतील अपयश भरुन काढण्याची ही संधी आहे.
>
> **– आ. मोनिका राजळे**

## SPOT NEWS

### नागवडे यांच्या प्रचारासाठी आज ठाकरे, थोरात यांच्या तोफा धडाडणार

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ. अनुराधा नागवडे यांच्या प्रचारासाठी शिवसेनाप्रमुख, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व काँग्रेस वर्किंग कमिटीचे नेते बाळासाहेब थोरात यांची गुरुवार दि. १४ रोजी दु. १२ वाजता श्रीगोंदा येथील संत श्री शेख महंमद महाराज मंदिर पटांगणात जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याची माहिती ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी दिली. श्रीगोंदा – नगर विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीतील शिवसेना पक्षाच्या वतीने सौ. अनुराधा नागवडे या मशाल चिन्हावर निवडणूक लढवीत असून त्यांच्या प्रचारासाठी गुरुवारी दुपारी शिवसेनाप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्याचे माजी महसूल मंत्री काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभा श्रीगोंदा येथे शेख महंमद महाराज मंदिर पटांगणात आयोजित करण्यात आली आहे. या सभेला राष्ट्रवादीच्या खासदार फौजीया खान, मराठा मुस्लिम महासंघाचे अध्यक्ष सुभान अली खान व शिवसेना नेते मिलिंद नार्वेकर उपस्थित राहणार आहेत. तसेच अहमदनगर जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे सर्व प्रमुख नेते व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. तरी श्रीगोंदा नगर विधानसभा मतदारसंघातील मतदार बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन बाबासाहेब भोस, शिवसेना उपनेते साजन पाचपुते, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी केले आहे.

# देशातील सहकार चळवळीने समताचा आदर्श घ्यावा

## शरदचंद्र पवार । समता पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाला दिली सदिच्छा भेट

**● कोपरगाव । वीरभूमी–**

भारतातील कर्नाटक, केरळ, गुजरात या राज्यात सहकारी पतसंस्था चळवळ अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था चळवळ ही इतर राज्यांपेक्षाही सक्षम असून महाराष्ट्रातील पतसंस्था चळवळीचे नेतृत्व कोपरगावचे काका कोयटे यांच्याकडे असल्यामुळे शक्य झाले आहे. याचा कोपरगावकरांना अभिमान वाटला पाहिजे. तसेच काका कोयटे यांच्या समता पतसंस्थेतील नाविन्यपूर्ण अत्याधुनिक तंत्रज्ञानाबाबत ऐकत होतो. प्रत्यक्षात समता पतसंस्थेला भेट देऊन ते अनुभवले. समता पतसंस्थेचे नावीन्यपूर्ण अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आदर्श देशातील सहकारी चळवळीने घ्यावा.असे गौरवोद्गार सहकाराचे जनक मा. शरदचंद्रजी पवार यांनी काढले.




कोपरगाव मतदार संघातील विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी शरदचंद्रजी पवार कोपरगाव तालुक्यात आले असता त्यांनी जाणीवपूर्वक काका कोयटे यांचे गाव का? अशी विचारणा करत स्वतःहून समता पतसंस्थेला भेट दिली असता, महाराष्ट्रातील अग्रगण्य समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या भव्य इमारतीचे 'सहकार मंदिर' असे नामकरण शरदचंद्रजी पवार यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना काका कोयटे म्हणाले की, समता पतसंस्थेला सहकाराचे जनक मा. शरदचंद्रजी पवार यांनी स्वतःहून भेट दिल्याबद्दल समता परिवार धन्य झाला. आम्ही गेल्या काही महिन्यात १ हजार कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार करणार आहोत. समताचे अत्याधुनिक तंत्रज्ञान व ग्राहकसेवा बाबत महाराष्ट्रात असलेल्या नावलौकिकामुळे संस्थेचे भव्य मुख्य कार्यालय हे 'सहकार मंदिर' या नावाने ओळखले जावे ही इच्छा होती. ती इच्छा मुख्य कार्यालयाला 'सहकार मंदिर' असे नाव देऊन पूर्ण झाली आहे.

या नामकरण सोहळ्याचे प्रास्ताविक समता पतसंस्थेचे संचालक संदीप कोयटे यांनी केले. या वेळी संदीप वर्पे, समता पतसंस्थेचे संचालक जितूभाई शहा, अरविंद पटेल, गुलशन होडे, किरण शिरोडे, व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष सुधीर डागा, खजिनदार तुलसीदास खुबाणी, सचिव प्रदीप साखरे, उद्योगपती मनोज अग्रवाल, राजेश ठोळे, अजित लोहाडे, प्रकाश शिरोडे, अरविंद भन्साळी, मुख्य कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी मानले.

# तिळवण तेली समाज आ. आशुतोष काळेंच्या पाठीशी

**● कोपरगाव । वीरभूमी–**

तिळवण तेली समाजाच्या मागण्या घेवून ज्या ज्या वेळी गेलो त्या त्यावेळी कधीही रिकाम्या हाताने परत आलो नाही. कोपरगाव शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या मंदिरासाठी आ.आशुतोष काळे यांचे मोलाचे योगदान आहे. त्यामुळे आपल्या अडचणी सोडविणारा व आपल्या भावनांची कदर करणाऱ्या आ.आशुतोष काळे यांच्या पाठीशी कोपरगाव मतदार संघातील संपूर्ण तिळवण तेली समाज खंबीरपणे उभे राहणार असल्याचे तिळवण तेली समाजाचे नेते व राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष रमेश गवळी यांनी म्हटले आहे.



कोपरगाव मतदार संघातील तिळवण तेली समाज बांधवांची बैठक नुकतीच कोपरगाव येथे आ. आशुतोष काळे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी त्यांनी आ.आशुतोष काळे यांनी समाजासाठी केलेल्या भरीव सहकार्यातून उतराई होण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.

ते पुढे म्हणाले की, कोपरगाव शहरासह मतदार संघात तिळवण तेली समाजाने सामाजिक, धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिलेले आहे. परंतु कोपरगाव तालुक्यात कुठेच श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचे मंदिर उभारलेले नव्हते व समाजाचे सभागृह देखील नव्हते. त्यामुळे मागील तीन दशकांपासून कुठेच श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराजांची जयंती कार्यक्रम व सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी कुठेच सांस्कृतिक भवन नव्हते. गेल्या पंचवीस तीस वर्षांपासून पुण्यतिथी, जयंती, तसेच सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी देखील जागा नव्हती. त्यासाठी समाजाने आपापल्या परीने पुढाकार घेवून समाज बांधवांच्या सहकार्याने पाच वर्षापूर्वी जागा देखील खरेदी केली परंतु त्या ठिकाणी मंदिर आणि सभागृह कसे उभे करायचे असा प्रश्न समाज बांधवांना पडला होता.

त्यावेळी सर्व तिळवण तेली समाज बांधवांनी एकत्र येत आ.आशुतोष काळे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे मंदिर आणि सांस्कृतिक भवनाचा प्रश्न मांडला असता शंभर टक्के सहकार्य करण्याचे फक्त आश्वासनच दिले नाही तर तातडीने दहा लाख रुपये निधी देखील उपलब्ध करून दिला आणि अधिक निधीची गरज भासल्यास निधी देवू अशी ग्वाही देखील दिली त्यामुळे मागील अनेक दशकापासूनचे श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांचे मंदिर व सांस्कृतिक भवन बांधण्याचे समाज बांधवाचे स्वप्न सत्यात उतरण्यास सुरुवात होवून मंदिराचे व सांस्कृतिक भवन उभे राहिले आहे.त्यामुळे तिळवण तेली समाज बांधव यापूर्वीही आ.आशुतोष काळेंच्या सोबत होता व यापुढेही सोबत राहणार असल्याचे ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष रमेश गवळी यांनी सांगितले.

# शेवगाव-पाथर्डी मतदार संघात सरपंच मोनाली राजळे यांचा जोरदार प्रचार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

पाथर्डी शेवगाव मतदार संघामध्ये राजळे कुटुंबीय प्रचार दौरे करत असुन स्व. राजीव राजळे यांचे विकासाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्या जाऊबाई मोनाली राजळे यांनी प्रचारामध्ये महिला समवेत दौरे करतांना दिसत आहेत. सौ. मोनाली राजळे या कासारपिंपळगावच्या सरपंच असुन गेल्या सहा महिन्यापासुन मतदार संघामध्ये फिरत आहेत बोले तैसा चाले अशा स्वभावाच्या मोनाली राजळे यांना ग्रामपंचायत प्रशासन कामकाजाचा चांगला अनुभव असल्याने गावातील अनेक प्रश्न गावात सोडवणुक कशी करावी याचे मार्गदर्शन त्या गेल्या सहा महिन्यांपासून करत आहेत. कुठल्याही परिस्थितीमध्ये आमदार मोनिकाताई राजळे यांना विजय करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न त्या करतांना दिसत आहेत. मोनाली राजळे यांच्या सोबतच राहुल राजळे व मोनिकाताई यांचे चि. कृष्णा हेही प्रचारात सक्रिय झाले आहेत.



कासार पिंपळगावच्या सरपंच असलेल्या मोनाली राजळे या जिल्हा परीषद गटांमधील सर्वांच्या सुख दुःखामध्ये सतत सहभागी असतात. प्रशासकीय कामकाज व जनसंपर्कामध्ये अत्यंत तात्काळ काम करणाऱ्या म्हणुन त्यांची एकप्रकारे ओळख निर्माण झाली आहे. कुठलेही काम असेल ते त्यांच्या समोर गेले की, ते कसे लवकर मार्गी लावता येईल त्यासाठी कोणत्या अधिकाऱ्यांना बोलता येईल. आमदार मोनिका राजळे यांच्याकडे पाठपुरावा करुन ते करुनच घेतल्याशिवाय त्या स्वस्थ बसत नाहीत. त्या सध्या विधानसभेच्या प्रचारामध्ये आमदार मोनिका राजळे यांच्या खांद्याला खांदा लावुन यंत्रणा सांभाळत आहेत.

त्यामुळे मतदार संघामध्ये जाऊबाई जोरात अशाप्रकारचा त्यांचा नावाने एक ट्रेंड सुरु असुन त्यास लोकप्रियता मिळत आहे. तसेच आमदार मोनिका राजळे यांचा मुलगा चि. कृष्णा याचे प्रचारातील अपडेट व नियोजन करतांना दिसत आहेत. त्यामुळे आमदार मोनिका राजळे या मतदारसंघामध्ये पुर्ण वेळ देवून कार्यकर्ते व पक्षाचे निरिक्षक आदी बरोबर प्रचारामध्ये मोठी मुसंडी मारत असुन विजयाची हॅट्रीक करणार असल्याचा विश्वास त्यांच्या यंत्रणेला आहे.

# सततच्या कामातून तालुक्याची अर्थव्यवस्था व बाजारपेठ समृद्ध

## आ. बाळासाहेब थोरात । संगमनेर मध्ये व्यापाऱ्यांशी साधला संवाद

**● संगमनेर । वीरभूमी –**

राज्यात मिळालेल्या संधीचा उपयोग तालुक्याच्या विकासासाठी आपण सातत्याने केला आहे. विविध संस्था व व्यवसायांमधून ग्रामीण भागातील कुटुंबांमध्ये अर्थव्यवस्था मजबूत झाली आहे. याचा लाभ बाजारपेठेत होत असून चांगले बंधू भावाचे वातावरण याचबरोबर तालुक्याची चांगली अर्थव्यवस्था यामुळे संगमनेरच्या बाजारपेठेत समृद्धी आली असून ती सर्वांसाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन काँग्रेस पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी काढले असून संगमनेर तालुक्यातील बँकांमध्ये साडेआठ हजार कोटींच्या ठेवी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मालपाणी लॉन्स येथे व्यापारी बांधवांशी संवाद या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मा आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. संजय मालपाणी, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष योगेश कासट, सुधाकर जोशी, निलेश जाधव, प्रकाश कलंत्री, ओंकार भंडारी, सोमेश्वर दिवटे, के. के. थोरात, सुभाष ताजने, कल्पेश मेहता, कैलास सोमानी, राणी प्रसाद मुंदडा आदींसह संगमनेर शहरातील विविध व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार थोरात म्हणाले की, संगमनेर तालुक्यातील जनतेचे प्रेम आणि नेतृत्वाचा विश्वास यामुळे सलग ९ व्यांदा विधानसभेत काम करण्याची संधी मिळत आहे. राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर मोठी संधी मिळाल्याने या संधीचा उपयोग संगमनेर तालुक्याच्या विकासासाठी आपण केला आहे.

संगमनेरकरांचा सन्मान वाढेल असे राज्यात काम केल्याने चंद्रपूर ते पालघर कुठेही गेले तरी संगमनेरचा आदर केला जातो. राजकारणात सुद्धा आपण राज्याला दिशादर्शक अशी संस्कृती निर्माण केली आहे. पसायदान आणि राज्यघटनेवर आपला विश्वास असून निवडणूक संपली की सर्वांना सोबत घेऊन आपण काम करतो.

### थोरात हे आमच्यासाठी पक्ष अन् राजकारण नसून संगमनेरकरांची भावना : डॉ. मालपाणी

■ आमदार बाळासाहेब थोरात यांनी कधीही भेदभाव केला नाही. शहरात चांगले वातावरण रहावे. यासाठी सातत्याने काम केले असून कुटुंबप्रमुख म्हणून प्रत्येक संगमनेरकरांना त्यांचा अभिमान आहे. ते आमच्यासाठी पक्ष किंवा राजकारण नसून संपूर्ण संगमनेरकरांची भावना असल्याचे गौरवउद्गार डॉ. संजय मालपाणी यांनी काढले आहे.

शांतता सुव्यवस्था असेल तर सर्व आनंदाने चालते. हे सलोख्याचे बंधू भावाचे वातावरण आपले जपले आहे. काही मंडळी शांतता भंग करण्याचा प्रयत्न करतात दोशी असेल त्याच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. दोन दिवसांपूर्वी झालेल्या घटनांमधील दोषी कोण आणि घटना घडवणारे कोण, त्याचा राजकीय फायदा घेणारे कोण हे तपासून पहा. याचबरोबर संगमनेर तालुक्यातील सहकारी बँका पतसंस्था यामध्ये ८५३७ कोटींच्या ठेवी असून जगभरातील सर्व बँका संगमनेर मध्ये आहेत. तालुक्यातून साडेनऊ लाख लिटर दूध उत्पादन होत असून सहकारी संस्था नोकरदार पोल्ट्री व्यवसाय फळबागा यामधून मोठी आर्थिक उलाढाल शहरांमध्ये होत असते. संगमनेर मधील शेतकरी, व्यापारी प्रामाणिक असून येथे आनंदाचे वातावरण आपल्याला टिकवायचे आहे.

आपण कधीही विरोधासाठी विरोध केला नाही. विरोधकांना सुद्धा मदत केली. विरोधकांचे कृषी महाविद्यालय.मेडिकल कॉलेज हे आपण दिले आहे अडथळे निर्माण केले नाही यामुळे अनेक बाहेरील विद्यार्थी संगमनेर आले अर्थव्यवस्था फुलली या सर्व जमेच्या बाजू आहेत.



हे वातावरण आपल्याला टिकवण्यासाठी एकत्र येऊन काम करायचे आहे ही संस्कृती आपल्याला पुढे न्यायची असल्याचे ते म्हणाले.

डॉ.संजय मालपणी म्हणाले की, निळवंडे धरण व कालवे हे आमदार बाळासाहेब थोरात यांनी केली असून तालुक्यातील प्रत्येक व्यक्ती त्यांच्यावर प्रेम करते. सहकारांमध्ये आपला तालुका उत्कृष्ट असून विस्ताराने मोठा असूनही शैक्षणिक संस्था आणि चांगले वातावरण यामुळे संगमनेरचे नाव राज्य पातळीवर गेले आहे. आमदार बाळासाहेब थोरात राजकीय पक्षाचे नसून संगमनेर तालुक्याच्या विकासाचा विचार असल्याचे त्यांनी म्हटले.

यावेळी प्रकाश कलंत्री, विवेक कासार, चेतन कर्डिले, केके थोरात, निलेश जाधव, विजय राहणे, योगेश कासार, ओंकार मंडळी आदींची भाषणे झाली. यावेळी संगमनेर शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर– ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

SPOT NEWS

## आ. आशुतोष काळेंच्या प्रचारार्थ आज अजित पवार यांची सभा

**कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगाव विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार आ.आशुतोष काळे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची जाहीर सभा गुरुवार (दि.१४) रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान कोपरगाव येथे सायंकाळी ५.०० वाजता आयोजित केली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी दिली आहे. कोपरगाव विधानसभा मतदार संघात आ. आशुतोष काळे यांनी पाच वर्षात केलेल्या विकास कामांच्या जोरावर महायुतीचे वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून आ.आशुतोष काळे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. आ. आशुतोष काळे यांनी प्रचारात आघाडी घेतलेली असून महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते देखील मोठ्या जोशात प्रचार करीत आहे. आ.आशुतोष काळे यांच्या अथक प्रयत्नातून कोपरगाव मतदार संघातील बहुतांश रस्ते, वीज, पाणी, आरोग्य आदी विकासाचे मुलभूत प्रश्न मार्गी लावले आहेत. मतदार संघातील जनतेशी नेहमी संपर्कात राहणारा व जनतेचे प्रश्न आणि अडी-अडचणी सोडवून कोपरगाव मतदार संघाचा सर्वांगीण विकास करण्यात आ.आशुतोष काळे यशस्वी झाले आहेत. या कामी त्यांना राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची मोलाची साथ व सहकार्य मिळाले असून आपल्या शिलेदाराच्या प्रचारासाठी ते स्वत: गुरुवार (दि.१४) रोजी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांचे विचार ऐकण्यासाठी महायुतीतील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर यांनी केले आहे.

# प्रताप ढाकणे यांच्या संघर्षाला व खंबीर नेतृत्वाला न्याय द्या

### खा. निलेश लंके । ॲड. प्रताप ढाकणे यांच्या प्रचारार्थ खरवंडी कासार येथे सभा

**पाथर्डी । वीरभूमी –**

यावेळी जर चुक झाली तर ती मतदार संघातील सर्व सामान्यांसाठी परवडणारी नाही. प्रताप ढाकणेंचं राजकारण जीवंत ठेवायचं असेल तर ही शेवटची संधी आहे. म्हणून चूक करू नका. राजकारणात चुकीला माफी नाही. हा घरातला आणि हक्काचा आमदार होणार याबद्दल मोठा आत्मविश्वास आहे. रथाची दोन्ही चाकं सारखीच असतील तर तो रोखला जाणार नाही. म्हणून शेवगाव- पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगिण विकासासाठी माझ्या विचारांचा आमदार निवडून द्या. असे आवाहन खासदार निलेश लंके यांनी केले.



ॲड. प्रताप ढाकणे यांच्या प्रचारार्थ खरवंडी कासार येथे आयोजित भालगाव जि. प. गटातील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे, शिवसेनेचे उबाठा जिल्हा उपप्रमुख रफिक शेख, राजेंद्र दौंड, गहिनीनाथ शिरसाठ, दिनकरराव पालवे, सुभाष केकाण, गहिनीनाथ थोरे, सीताराम बापू बोरुडे, किरण शेटे, राजेंद्र ढाकणे, सुभाष ढाकणे, बाळासाहेब दराडे, राम लाड, गणेश चितळकर, राजेंद्र हिंगे, शौकत शेख, बाळासाहेब बटुळे, अर्जुन धायतडक, सचिन पालवे, सुभाष गर्जे, गणेश देवढे, संजय देवढे, सुभाष फुंदे, बाळासाहेब देवढे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

खा. लंके पुढे म्हणाले, या भागातील विकासाचा बॅकलॉग भरून काढायचा असेल तर कर्तृत्ववान माणसाला निवडून द्यायला हवं. या भागातील ढासळलेला शैक्षणिक दर्जा पूर्वपदावर आणण्यासाठी व्हिजन असलेला आमदार हवा आहे. बेरोजगारी आणि सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी मी शब्द देतो. त्यासाठी फक्त एकदा प्रताप ढाकणेंना आमदार करा. ज्याच्या अंगात पाणी नाही तो पाणी कसा आणणार ? म्हणून अंगात पाणी असलेल्या माणसाला संधी द्या. काम करण्यासाठी इच्छाशक्ती हवी असते, जी काकांकडे आहे. परिवर्तन अटळ आहे, फक्त मताधिक्यात या गटाचा सिंहाचा वाटा असायला हवा. हे ढाकणेंचं घरचं मैदान आहे. अगोदर घर पक्कं असेल तर काहिही करता येणं शक्य होतं. प्रत्येक नेत्याने हेच केलं आहे. माझा, माझ्या तालुक्यावर विश्वास आहे. म्हणूनच माझ्या पत्नीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असूनही मी ढाकणेंच्या प्रचाराला येऊ शकलो. तेव्हा घरच्या मैदानावर मोठं मताधिक्य मिळायलाच हवं, असं आवाहन करून खासदार निलेश लंके यांनी उपस्थितांना निवडणुकीच्या टीप्स दिल्या.

सत्ता ही हेतू नसून ते साधन आहे, असं सांगत प्रताप ढाकणे म्हणाले, मोठी माणसं विशिष्ट जातीची नसतात. स्व. गोपीनाथ मुंडे साहेब, विलासराव देशमुख आदी नेत्यांनी जेव्हा सत्ता मिळाली तेव्हा ती लोकांसाठी राबविली. ज्यांच्या नावावर सत्ता मिळवली त्यांना तुम्ही विसरले. आणि पुन्हा त्यांच्याच नावाने मत मागत आहात. जिथं पाथर्डी शहराचं सांडपाणी येतं तिथं तुम्ही जॉगिंग पार्क केला आणि तिथंच स्व. गोपीनाथ मुंडे यांचा पुतळा उभारण्याचा घाट घातला. परंतु पुतळा तर बसवला नाही व वर्गणीचा ही हिशोब नाही. मी तीनदा पराभव स्वीकारला तरीही लोकांत राहिलो. या मतदारसंघातील तरुणांच्या हाताला काम नाही. शेतीसाठी पाणी नसल्यामुळे लोकांना स्थलांतरित व्हावं लागतं. मी, भगवानबाबांची शपथ घेऊन सांगतो की, मी आमदार झालो तर पाणी आणल्याशिवाय राहणार नाही. दुसरी शपथ यासाठी घेतो की कामांची गुणवत्ता राखली जावी म्हणून टक्केवारी घेणार नाही. निवृत्तीवेतन मला ठेऊन माझा आमदारकीचा पगारही लोकांच्या दवाखान्यांसाठी देणार आहे. परळीच्या ताईवर दबाव असल्याचे सांगून ढाकणे शेवटी म्हणाले, फडणवीस हे आधुनिक अणाजी पंत असून त्यांनी महाराष्ट्राचं व महाराष्ट्र धर्माचं वाटोळं केलं. किरण खेडकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर राजेंद्र हिंगे यांनी मनोगत व्यक्त करत आभार मानले.

# निळवंडेच्या पाण्यापासून कुणीही वंचित राहणार नाही

### डॉ. जयश्रीताई थोरात । तळेगाव भागातील प्रचार दौऱ्यांना नागरीकांचा उस्फुर्त प्रतिसाद

**संगमनेर । वीरभूमी–**

निळवंडे धरण व कालवे आमदार बाळासाहेब थोरात यांनी पूर्ण केले आहे. कालव्यांद्वारे शेतामध्ये पाणी आले आहे. भोजापूर चारीसह निळवंडे कालव्यातून वंचित राहिलेल्या सर्वांना पाणी देण्यासाठी आमदार बाळासाहेब थोरात यांचे काम सुरू असून या पाण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही असे प्रतिपादन युवक नेत्या डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे.



तळेगाव भागातील काकडवाडी, पारेगाव बुद्रुक, पारेगाव खुर्द, सोनोशी, सुकेवाडी, समनापुर, येथील नागरिक व महिलांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. यावेळी समवेत बी. आर. चकोर, सौ.पद्माताई थोरात, जनार्दन कासार, सखाराम शरमाले, सचिन गायकवाड सुनील कासार, अलका गिरी आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, संगमनेर तालुका हा विस्ताराने खूप मोठा असूनही आमदार बाळासाहेब थोरात यांनी प्रत्येक गावात व वाडी वस्तीवर विकासाच्या योजना राबवल्या आहेत. संगमनेर तालुका त्यांनी परिवार मानला आहे. आणि तालुक्यातील प्रत्येक कुटुंबाच्या विकासासाठी त्यांनी काम केले आहे. त्यामुळे तालुक्यातील जनतेमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण असून ही निवडणूक तालुक्यातील नागरिक व महिलांनी हाती घेतली आहे.

निळवंडे धरण व कालवे हे आमदार बाळासाहेब थोरात यांनी पूर्ण केले. त्यांच्या प्रयत्नातून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आले जो भाग वंचित आहे. त्याला पाणी देण्यासाठी आमदार बाळासाहेब थोरात यांनी नियोजन केले आहे. उपसा जलसिंचन योजना मंजूर करून ठेवल्या होत्या. विद्यमान पालकमंत्री यांनी त्या रद्द केले आहेत परंतु वीस तारखे नंतर महाविकास आघाडीचे सरकार येणार असून निळवंडे कालवे व भोजापूरच्या पाण्यापासून कुणीही वंचित राहणार नाही यासाठी नियोजन केले असून त्यासाठी काम होणार असल्याचे डॉ. जयश्रीताई थोरात यांनी म्हटले आहे

बी. आर. चकोर म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांनी भोजापुर चारीतून अनेक गावांना पाणी दिले आहे. जे उर्वरित गाव आहेत त्यांना पाणी देण्यासाठी कारखान्याच्या माध्यमातून दरवर्षी मोठा प्रयत्न होतो. परंतु यावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी उपसा जलसिंचन योजना या अत्यंत प्रभावी आहे. आमदार थोरात यांनी ती मंजूर करून ठेवली. मात्र विखे यांनी ती रद्द केली. परंतु महाविकास आघाडीचे सरकार सत्तेपर्यंत आल्यावर ही उपसा जलसिंचन योजना मंजूर करून याद्वारे सर्व भागाला पाणी मिळणार आहे. भूलथापा देणारे आता निवडणुकीसाठी येतील त्यांना आपल्या पाण्याची आणि भावनांशी घेणे देणे नाही. त्यामुळे कोणीही विरोधकांच्या खोटे आश्वासनाला बळी न पडता आमदार बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन केले.

यावेळी विविध गावांमधून निघालेल्या संवाद यात्रांना नागरिक महिला व युवकांनी मोठा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# मातंग समाजाने महायुतीच्या उमेदवारालाच मतदान करावे : अनिल जाधव

**कोपरगाव । वीरभूमी –**

आजवर मातंग समाजाच्या मागण्याकडे सातत्याने दुर्लक्ष होत आले आहे परंतु जेव्हापासून राज्यात भाजपा, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) व मित्र पक्षांचे महायुती सरकार स्थापन झाले तेव्हापासून मातंग समाजाच्या उत्कर्षासाठी महायुती सरकारने मोलाचे सहकार्य केले आहे. या गोष्टीची जाणीव ठेवून समस्त मातंग समाजाने होवू घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या सर्वच उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे असे आवाहन लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्याचे तालुकाध्यक्ष अनिल जाधव यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे.

प्रसिद्धी पत्रकात त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, विद्यमान महायुती सरकारने मातंग समाजाच्या विद्यार्थ्यांच्या उच्च दर्जाच्या शैक्षणिक विकासासाठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) निर्मिती केली. क्रांतिगुरु लहुजी साळवे यांचे पुण्यातील स्मारकासाठी दोनशे पंचवीस कोटीं रुपयांची तरतूद करून काम सुरू केले.साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या मुंबईतील चिरागनगर येथिल स्मारकासाठी ३०५ कोटी रुपयांची तरतूद केली.साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे वाटेगाव या जन्मस्थळाचा विकास करण्यासाठी २५ कोटी रुपयांची तरतूद केली.

मा.सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी अनुसूचित जाती मध्ये आरक्षण वर्गीकरण करण्याचा राज्यांना अधिकार असल्याचा ऐतिहासिक निकाल दिला या माध्यमातून आरक्षणापासून वंचित राहिलेल्या जातींना सामाजिक न्याय दिला.साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाला भरघोस निधी देऊन महामंडळाला पुनर्जीवित केले.क्रांतिगुरु लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या ज्या १९ शिफारशी महामंडळाशी संबंधित होत्या, त्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली.महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विधानपरिषदेवर आजपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाने मातंग समाजाच्या एकाही कार्यकर्त्याला स्थान दिले नव्हते. परंतू महायुती सरकारने पिंपरी चिंचवड येथील भारतीय जनता पक्षाचे उच्चशिक्षित कार्यकर्ते अमित गोरखे यांना विधान परिषदेवर आमदार करून प्रथमच मातंग समाजाला प्रतिनिधित्व दिले.

रशिया मध्ये मॉस्को या राजधानीच्या शहरात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक उभारले. महाराष्ट्राचे विधानभवन आणि मंत्रालय मधील चौकाला साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे नाव दिले आहे या सगळ्या बाबी महायुती पक्ष्याच्या कार्यकाळात झाल्या आहेत म्हणुन या गोष्टीने सर्वच मातंग समाज्याची मान उंचावली आहे.

महायुती सरकारच्या या ऋणातून उतराई होण्यासाठी सर्वच मातंग समाजाने महायुतीच्याच उमेदवारांनाच मतदान करून निवडून आणणे आपले कर्तव्य आणि आपली जबाबदारी देखील आहे.

# जिल्हा लिंगायत संघर्ष समितीच्या बैठकीत पदाधिकारी निवड

**कोपरगाव । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा लिंगायत संघर्ष समिती व कोपरगाव तालुका लिंगायत संघर्ष समितीच्यावतीने आयोजित जिल्ह्यातील लिंगायत संघर्ष समिती पदाधिकारी व समाज बांधव यांची बैठक समता इंटरनॅशनल स्कूल मध्ये लिंगायत समाजाचे लोकनेते ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.



या बैठकीत अहिल्यानगर जिल्हा लिंगायत संघर्ष समिती जिल्हा कार्यकारणी मध्ये श्रीरामपूर येथील युवा कार्यकर्ते विशाल निकाडे यांची कार्याध्यक्षपदी तर राहाता तालुक्यातील युवा नेतृत्व अमोल झळके यांची जिल्हा कार्यकारणीवर उपाध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

विशाल निकाडे हे गेल्या १० वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून श्रीरामपूर तालुक्यातील लिंगायत समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्यांचा सुरेश जनरल स्टोअर्स व रामकमल एंटरप्राइजेस या फर्मच्या माध्यमातून देखील सामाजिक कार्यात सिंहाचा वाटा असतो.

राहाता तालुक्यातील अमोल झळके हे व्यापारी असून त्यांचे शिवम सेल्स बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स नावाचे फर्म आहे. शिवगर्जना मंडळाच्या माध्यमातून गेल्या २१ वर्षापासून सामाजिक कार्याला त्यांनी वाहून घेतले आहे. राहाता तालुक्यातील लिंगायत समाजातील बांधवांना एकत्र करून महात्मा बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक व महाप्रसादाचे आयोजन प्रत्येक वर्षी करत असतात. तसेच तालुक्यातील सामाजिक कार्यातही मोठ्या प्रमाणात सहभाग असतो.

यावेळी श्रीरामपूर येथील वीरशैव लिंगायत समाज संघटनेचे खजिनदार किशोर सोसे व पदाधिकारी दिनेश वाडनकर, शिर्डी महाविद्यालयाचे प्राचार्य विकास शिवगजे, एस जी विद्यालयाचे सेवानिवृत्त शिक्षक दत्तात्रय विरकर, गोपीनाथ निळकंठ, गिरीश सोनेकर, मधुकर झळके, प्रकाश वाळेकर, अनिल जंगम, विलास वाळेकर, विकासआप्पा चेनुके, साखरे सर, लोहारकर सर, तांदळे, लिंगायत महिला मंडळ अध्यक्षा सौ.सुहासिनी ओमप्रकाश कोयटे, सौ.मंगल साखरे, अमोल राजूरकर, अमोल साखरे, सतीश निळकंठ आदींसह अहिल्यानगर जिल्ह्य लिंगायत संघर्ष समिती पदाधिकारी, कोपरगाव वीरशैव महिला मंडळाच्या महिला पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार प्रदीप साखरे यांनी मानले.

> लिंगायत संघर्ष समितीच्या संघर्षातून महाराष्ट्रातील लिंगायत समाजाच्या १४ पोट जातींना आरक्षण मिळालेले आहे. महाराष्ट्रात लिंगायत संघर्ष समितीची ताकद वाढविण्यासाठी संघटनेतील तरुण, युवा पदाधिकाऱ्यांनी जबाबदारीने जबाबदारी पार पाडावी.
>
> – **प्रदीप साखरे**, युवा जिल्हाध्यक्षध्यक्ष

> लिंगायत समाजाचे लोकनेते काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्वी आम्ही प्रत्येक तालुक्यात जाऊन लिंगायत संघर्ष समितीचे संघटन मजबूत केले आहे. काका लिंगायत समाजाचे विविध प्रश्न संघटनेच्या माध्यमातून राज्य, केंद्र सरकारकडे मांडत असतात. संघटनेची ताकद वाढावी यासाठी काका देखील महाराष्ट्रभर फिरत असतात. निवड झालेल्या तरुण, युवा पदाधिकाऱ्यांनी संघटनेसाठी काम करून समाजाच्या प्रगतीला बळ द्यावे.
>
> – **गोपीनाथ निळकंठ,** ज्येष्ठ पदाधिकारी

# घोटण, खानापूर मध्ये शेकडो युवकांचा भाजपत प्रवेश

## विकासाच्या मुद्द्यावर मोनिका राजळेंच्या सोबत असल्याचा विश्वास केला व्यक्त

**● शेवगाव । वीरभूमी –**
आमदार मोनिका राजळे यांनी ऊस दराबाबत शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला आहे, त्यामुळे त्यांचा शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार केला. त्यांनी पैठण ते तिसगाव रस्त्यासाठी २१५ कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला. घोटण सारख्या गावात तब्बल दहा कोटी रुपयांची विकास कामे केली, त्या ज्या बोलतात ते करतात. त्यामुळे, या परिसरातील नव्हे तर तालुक्यातील शेतकरी त्यांच्या मागे ठाम उभा राहतील असा विश्वास शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अशोक भोसले यांनी व्यक्त केला. यावेळी अनेक युवकांनी आमदार मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये पक्ष प्रवेश करतांना विकासाच्या बाजूने उभा राहणार असल्याचे सांगितले.

बुधवारी तालुक्यातील तळणी, बाभूळगाव, घोटण, अंतरवाली, खानापूर, कऱ्हेटाकळी, एरंडगाव, लाखेफळ, दहिफळ जुने, नवीन, बोडखे, ताजनापुर, खुंटेफळ, दादेगाव आदी गावातील नागरिकांशी संवाद साधला. यावेळी घोटण येथे भोसले मेजर बोलत होते. पुढे बोलताना, आगामी काळात ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित पाहून मतदारसंघातील इतर साखर कारखान्यांच्या तुलनेत ऊसाला उच्चांकी दर देतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी सभाजी लेंडाळ, अनिल लेंडाळ, अमोल जगधने, अक्षय क्षीरसागर, सलिम शेख, असिम शेख, दत्ता वल्हे, लक्ष्मण मोटकर, विशाल मोटकर, अमोल मोटकर, करण गायकवाड, योगेश क्षिरसागर, वैभव काकडे, तुकाराम कुलट आदींसह अनेक युवकांनी आमदार मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. यावेळी लक्ष्मण टाकळकर, संजय टाकळकर, संजय परदेशी, अनिल कटारिया, पीरमोहम्मद शेख, तुकानाना थोरवे, भाऊसाहेब क्षीरसागर, संजय क्षीरसागर, राजूतात्या घुगे, राजेंद्र घुगे, लक्ष्मण सुभाष मोटकर, अमोल मोटकर आदीसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खानापूर येथे बोलतांना शेतकरी नेते रावसाहेब लवांडे यांनी बोलतांना शेतकरी अडचणीत असताना वृद्धेश्वर वगळता, काहींनी ऊसाचे पेमेंट दिले नाहीत. तर एकाने अर्धवट पैसे जमा केले. शेतकऱ्यांचे हिताचे कोण हे ओळखले पाहिजे. गत दहा वर्षातील आमदार मोनिका राजळे यांच्या काळातील विकासकामे ठळकपणे दिसत आहेत. मात्र विरोधकांच्या काळातील विकास कामे दिसतं नाहीत. विरोधकांनी शेवगावला मॉडेल सिटी बनवू असे सांगितले, मात्र प्रत्यक्षात साधी एक मुतारी त्यांना बांधता आली नाही. ते आज विकासाच्या गप्पा मारत असून कोण काय म्हणते याकडे लक्ष न देता शेतकरी हिताचे व गावच्या विकासाच्या बाजूने आपल्याला जायचे आहे असे लवांडे पाटील म्हणाले.



आमदार मोनिका राजळे यांनी आपल्या भाषणात गावात व परिसरात केलेल्या विकास कामाचा आढावा घेत, शासनाने राबविलेल्या योजना सांगितल्या. शेतकरी व सामान्य जनतेच्या आशीर्वादाने सर्वाधिक मताने विजयी होणार असल्याचे सांगितले.

# कोपरगावचा संपूर्ण नरोडे परिवार आ. आशुतोष काळेंच्या पाठीशी : मनोज नरोडे



**● कोपरगाव । वीरभूमी–**
कोपरगाव मतदार संघाच्या विकासाला दिशा देवून कोपरगाव शहराचा पाणी प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे महिला भगिनींच्या डोक्यावरचा हंडा कायमचा उतरविला हे कोपरगाव शहरातील महिला भगिनींच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. त्यामुळे अशा विकासाची दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याला येणाऱ्या विधनासभा निवडणुकीत त्याच्या पाठीशी उभे राहणे हे आमचे कर्तव्य आहे. त्यामुळे कोपरगाव शहरातील आम्ही संपूर्ण नरोडे परिवार आ. आशुतोष काळे यांच्या पाठीशी उभे असून आमचा त्यांना खंबीर पाठींबा असल्याचे मनोज नरोडे यांनी सांगितले.

कोपरगाव शहरात नरोडे पाटील परिवार एक मोठा परिवार म्हणून या परिवाराकडे पाहिले जाते. या नरोडे परिवाराची नुकतीच आ. आशुतोष काळे यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी नरोडे परिवाराच्या वतीने आ.आशुतोष काळे यांचा सत्कार करून सुवासिनींनी त्यांचे औक्षण केले. येत्या काळात आ.आशुतोष काळे यांना नरोडे परिवार पूर्णपणे समर्थन करणार असून या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आ.आशुतोष काळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याची भूमिका तुकाराम नरोडे यांनी स्पष्ट केली आहे. संपूर्ण नरोडे परिवाराने आ.आशुतोष काळे यांनी पाच वर्षात केलेल्या विकास कामांचे कौतुक करून नरोडे परिवाराचा तुम्हाला सदैव पाठिंबा राहणार असल्याचे सांगत यापेक्षाही जास्त मतदार संघाचा आणि कोपरगाव शहराचा आपल्या हातून विकास व्हावा व आपल्या कोपरगाव मतदार संघाचे नाव विकासाच्या बाबतीत जिल्ह्याच्या नव्हे तर राज्याच्या पटलावर झळकावे अशा शब्दात आ.आशुतोष काळे यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पांडुरंग (तात्या) नरोडे, तुकाराम नरोडे, दिलीप नरोडे, बाळासाहेब नरोडे, सुनील नरोडे, अरविंद नरोडे, सुधाकर नरोडे, सुरेश नरोडे, प्रकाश नरोडे, सुधा तात्या नरोडे, राजेंद्र नरोडे, मधुकर नरोडे, डॉ.विजय नरोडे, दत्तात्रय नरोडे, विजू नाना नरोडे, भीमाशंकर नरोडे, अशोक नरोडे, संजय नरोडे, अनिल नरोडे, गणपत नरोडे, संतोष नरोडे, विनोद नरोडे, मनिल नरोडे, संकेत नरोडे, सागर नरोडे, भूषण नरोडे, पंकज नरोडे, राहुल नरोडे, अभिषेक नरोडे, शशांक नरोडे,शुभम नरोडे, मयूर नरोडे, सार्थक नरोडे, नकुल नरोडे, ऋषी नरोडे, डॉ. सागर नरोडे, डॉ. भरत नरोडे, महेश नरोडे, दिपू नरोडे, मोहित नरोडे, रोहित नरोडे, ऋतुराज नरोडे, कृष्णा नरोडे, ऋषिकेश नरोडे, चेतक नरोडे, गौरव नरोडे, संदिप नरोडे आदी उपस्थित होते.

# विजय निश्चित, परिवर्तनाच्या लढाईत सामील व्हा

## काशिनाथ दाते । सुपे येथे गावभट दौऱ्यानिमित्त मतदारांशी संवाद

**● पारनेर । वीरभूमी–**
महायुती सरकारने आपल्या कार्यकाळामध्ये राज्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय घेतल्यामुळे पुन्हा महायुतीचे सरकार येणार असून आपला विजय निश्चित आहे. तेव्हा या परिवर्तनाच्या लढाईमध्ये सामील व्हावे, असे आवाहन महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांनी गावभेट दौऱ्याप्रसंगी सुपे येथे केले.

यावेळी भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, जिल्हा बँकचे संचालक प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, माजी सभापती गणेश शेळके, भाजप तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सुषमा रावडे, प्रमोद घनवट, सुनिल थोरात, सरपंच मनोज मुंगशे, लहु भालेकर, सरपंच संतोष शेळके, चेअरमन रामचंद्र शेळके, आरपीआय तालुकाध्यक्ष राजु उबाळे, ग्रा.सदस्य शुभम गाडेकर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना काशिनाथ दाते म्हणाले तालुक्यात बेरोजगारी वाढली आहे. स्थानिक युवकांना एमआयडीसी मध्ये नोकरी मिळाली पाहिजे.



आपल्याला सुसंस्कृत तालुका घडवायचा आहे. म्हणून माझी खरी उमेदवारी आहे. महायुतीचे सरकार दोन वर्षांपूर्वी राज्यात आल्यानंतर त्यांनी घेतलेले निर्णय तुमच्यासमोर आहे. महायुती सरकारने शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे वीज बिल माफ केले ही योजना पुढील पाच वर्षे असणार आहे. सात रुपये लिटर दुधाला अनुदान दिले. एक रुपयात पिक विमा दिला. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलींना पहिलीपासून तर पदवीपर्यंत मोफत शिक्षण जाहीर केले असे अतिशय चांगले निर्णय या सरकारने घेतले. म्हणून राज्यात महायुतीचे सरकार सत्यात येणार आहे. केंद्रात आणि राज्यात एकच विचाराचे सरकार असल्यास या राज्याची भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही.

> महायुती सरकारचा लोकप्रिय झालेला निर्णय म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण जे काम इतरांना सुचले नाही ते महायुतीच्या सरकारने करून दाखवले. लाडकी बहिण योजनेचे पैसे देत असताना या तालुक्यात ७० हजार महिलांचे बँकेत खाते उघडली गेली. शासनाने दिवाळीपूर्वी साडेसात हजार रुपये खात्यावर दिले आणि हे पैसे कधी काढायचे व खर्च करण्याचे अधिकार माझ्या बहिणींना दिले आहे. महायुतीचा उमेदवार म्हणून माझ्या लाडक्या बहिणी मला मतदान केल्याशिवाय राहणार नाहीत.
>
> – **काशिनाथ दाते,** महायुती उमेदवार

> गावागावात भांडणे लावणे, दहशत निर्माण करणे, सरपंचांवर अविश्वास आणणे, सोसायटी निवडणुकीत लक्ष घालणे, तरुणांना रोजगार नाही. असे एक नाही तर अनेक प्रश्न तालुक्यात आहे. तेव्हा या निवडणुकीत खुप विचार करुन मतदान करा, हा तालुका राष्ट्रवादीला मानणारा आहे. काशिनाथ दाते हे सुशिक्षित व सुसंस्कृत असे उमेदवार असून त्यांच्या सारख्या उमेदवाराला विधानसभेत पाठविले पाहिजे.
>
> – **अशोक कर्डिले सर**

# श्रीगोंदा मतदारसंघातील मतदान कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण महाराजा कॉलेजमध्ये संपन्न

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**
विधानसभा निवडणुकीची तयारी म्हणून मतदान अधिकारी, मतदान कर्मचाऱ्यांचे द्वितीय प्रशिक्षण श्रीगोंदा येथील महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात बुधवार दि.१२ रोजी आयोजित करण्यात आलेले होते.या प्रशिक्षणास २२६ श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निरीक्षक श्रीमती. डी.रत्ना यांनी भेट दिली. यावेळी निरीक्षक श्रीमतीरत्ना यांनी सर्व प्रशिक्षणार्थींना निवडणूक कामकाजाबाबत तुम्ही पद्धतशीरपणे नियमाच्या अधीन राहून हे करू शकता हा दृष्टिकोन ठेऊन काम करावे ही सूचना केली.



तसेच मा.निवडणूक आयोगाने विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करून सर्व निवडणूक प्रक्रिया पार पाडावी. यात कोणतीही चूक अक्षम्य आहे. प्रत्येक निवडणुक ही वेगळी असते त्यामुळे सर्वांनी प्रत्यक्ष प्रशिक्षण व सर्व बाबींची काळजीपूर्वक माहिती घेण्याची सूचना केली. या प्रशिक्षणास शिर्डीचे अप्पर जिल्हाधिकारी श्री. कोळेकर, संभाजीनगरचे कार्यकारी अभियंता अरुण कटाळे यांनीही भेट दिली. यावेळी कोळेकर यांनी सर्व प्रशिक्षणार्थी यांना मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या आदल्या दिवशी कराव्या लागणाऱ्या सर्व बाबींची सविस्तर माहिती दिली. मतदान केंद्राध्यक्ष, प्रथम मतदान अधिकारी व इतर मतदान अधिकारी यांनी टीम म्हणून काम करावे आणि मतदानाच्या दिवशी आवश्यक असणारे सर्व महत्त्वाचे नमुने यात नमुना १७ क, नमुना १७ अ व केंद्राध्यक्ष दैनंदिनी व्यवस्थित भरावी. त्यांनी मतदान केंद्रावर प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. मतदान पथकातील सर्वांनी सर्व निवडणूक कामकाज समजून घेऊन केल्यास सर्व अधिकारी कर्मचारी यांचा आत्मविश्वास वाढतो ज्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत व व्यवस्थितपणे पार पाडली जाते

यावेळी त्यांनी ईव्हीएम मशीनमधील सर्व बारीक-सारीक गोष्टींची इत्यंभूत माहिती सांगितली आणि ईव्हीएम मशीनमध्ये येणाऱ्या संभाव्य अडचणींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी श्रीगोंदा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी गौरी सावंत, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. क्षितिजा वाघमारे, परिविक्षाधीन तहसीलदार प्रवीण मुदगुल, निवडणूक नायब तहसीलदार पंकज नेवसे उपस्थित होते.

# ताजनापुर टप्पा दोनचे ६५ टक्के काम पूर्ण; ठिबक सिंचनचे टेंडर जूनमध्ये होणार

**● शेवगाव । वीरभूमी –**
ताजनापूर टप्पा दोन योजनेचे ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे. रायझिंग मेन तसेच वितरण पंप हाऊसचे ९५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. यासह शेतातील पाईप लाईनचे देखील ६५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या योजनेचे टेंडर साधारण दीड वर्षापूर्वी निघाले आहे. पुढील वर्षी काम पूर्ण होऊन जानेवारीत सुरवातीला २५ टक्के शेतातील विहिरींना पाणीपुरवठा केला जाईल. ठिबक सिंचन योजनेचे टेंडर अद्याप निघालेले नाही. त्यामुळे ते रद्द होण्याचा प्रश्नच येत नाही. पाईप लाईनचे काम पूर्ण झाल्याखेरीज ठिबकचे काम कसे करता येईल, असे सांगून पाईप लाईनचे काम पूर्ण झाल्यावर साधारणपणे जुनमध्ये ठिबक सिंचन योजनेच्या टेंडरची प्रक्रिया सुरु होईल अशी अपेक्षा असल्याची माहिती जलसंधारण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

या योजनेचा सुमारे २० हजार शेतकऱ्यांना फायदा होणार असून सहा हजार नऊशे साठ हेक्टर क्षेत्राला याचा लाभ होईल, असे जलसंधारण विभागाच्या वतीने सांगण्यात आले. सध्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचारात आरोप प्रत्यारोप सुरु असून ताजनापुर योजनावरुन होणाऱ्या आरोपाचे खंडन करतांना, भाजपचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब पाटेकर यांनी असे कोणत्याही प्रकारचे टेंडर निघाले नसल्याचे तसेच रद्द न झाल्याचे सालवडगाव येथे बोलतांना सांगितले. यावेळी माहिती अधिकारात याची माहिती युवकांनी घ्यावी व सत्यता पडताळावी असे आवाहन करतांना, निवडणूक काळात विरोधक खोटे आरोप करुन, या प्रकारे संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असे पाटेकर म्हणाले. याबाबत वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता त्यांनी निवडणूक असल्याने नावं न छापण्याच्या अटीवर वरील माहिती दिली आहे.

या योजनेबाबत बोलतांना, कुरुडगाव येथील गट नंबर १९२ मध्ये, मे महिन्यात रान मोकळे असताना, शेतापर्यंत पाईप लाईनचे काम झाले आहे. ज्या ठिकाणी शेत मोकळे असेल अश्या क्षेत्रात काम होऊन, आमच्या गावच्या शिवारात, शेती अंतर्गत बऱ्यापैकी पाईप लाईनचे काम झाले आहे असे कुरुडगाव येथील शेतकरी बाबासाहेब थोरात यांनी सांगितले.